वाचले – १) माध्य/शि/०४/कावि/६७१/२०१७ दि.१७/१०/२०१७

२) मावि/भोसरी/९५/२०१८ दि.०६/०३/२०१८

३) माध्य/शि/०१/कावि/११०९/२०१८ दि.०१/११/२०१८

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/५८/२०१९
दि. १५/०१/२०१९

विषय – श्री.शिंगाडे विलास तुकाराम (सहा.शिक्षक) यांची १२ वर्ष वरीष्ठ वेतनश्रेणी वेतननिश्चिती आदेश रद्द करणेबाबत.....

आदेश,

माध्यमिक शिक्षण विभागाकडील माध्यमिक शिक्षकांना चट्टोपाध्याय आयोगानुसार १२ वर्षाचा लाभ मा.अतिरिक्त आयुक्त सो.यांचेकडील वाचले क्र.०१ च्या आदेशा अन्वये देणेत आलेले आहे.मा.वि.भोसरी या विद्यालयातील सहा.शिक्षक श्री.शिंगाडे विलास तुकाराम यांना १२ वर्षाचा लाभ दि.०८/०९/२०१५ पासुन देणेत यावा असा स्पष्ट उल्लेख असुन सुध्दा विद्यालयाने वाचले क्र. ०२ अन्वये २९/०७/२०११ पासुन वेतननिश्चिती करणेकामी प्रकरण सादर करणेत आलेले होते.सदरचे प्रकरण विद्यालयाच्या व मुख्यकार्यालयाच्या नजरचुकीने वेतननिश्चिती आदेशावर शिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्ष-या होउन आदेश निर्गत करणेत आलेले होते.

विद्यालयाने श्री.शिंगाडे यांचे २९/०७/२०११ पासुन फरकाचे बील सादर करणेत आलेले होते. त्याबाबत संदर्भीय वाचले क्र.०३ अन्वये विद्यालयास १२ वर्षाचे आदेशाचे अवलोकन करून बील फेरसादर करणेत यावे असे कळविलेले असतानाही दि.०७/१२/२०१८ रोजी १२ वर्ष आदेशातील तारीख दुरूस्ती करणेबाबत श्री.शिंगाडे यांचे प्रकरण सादर केलेले होते.

सबब मी शिक्षणाधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून श्री.शिंगाडे विलास तुकाराम सहा.शिक्षक यांना वाचले क्र.०२ च्या आदेशान्वये केलेली वेतननिश्चिती या आदेशान्वये रद्द करणेत येत आहे. सदर आदेशाची नोंद श्री.शिगांडे यांच्या मुळसेवानोंद पुस्तकात नोंद घेणेत यावी.

तसेच श्री.शिगांडे यांची १२ वर्षाची वेतननिश्चिती मुख्यकार्यालयाचे आदेश आल्यानंतर वेतननिश्चिती प्रस्ताव प्रस्तावित करणेत यावा.याची नोंद घ्यावी.

.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे १८

प्रति,
मुख्याध्यापक
माध्यमिक विद्यालय भोसरी
प्रत,
श्री.शिगांडे विलास तुकाराम (सहा.शिक्षक)